कानुबाई’ हे खानदेशचे आराध्यदैवत. कानुबाईच्याच नावाने खानदेशाला ‘कानुबाईचा देश’-कानदेश- ‘खानदेश’ असे नाव मिळाले आहे. ‘खानदेश’ नावाची उत्पत्ती तशी सांगितली जाते. कानुबाईचा उल्लेख ‘कानबाई’ असाही केला जातो.

कानुबाई ही निसर्गदेवता आहे. तिला प्रकृती मानले जाते. वंशवृद्धी व गोधनवृद्धीसाठी या निसर्गदेवतेची पूजा करण्यात येते. नागपंचमी च्या पहिल्या रविवारी कानुबाईची स्थापना करण्यात येते. कानुबाई ही श्रीफळ म्हणून पवित्र मानल्या जाणाऱ्या नारळाच्या रूपाने घरोघरी आणली जाते. बऱ्याच ठिकाणी हे नारळ पिढ्यानपिढ्या तेथील देव्हाऱ्यात जतन करून ठेवलेले असतात. कानुबाईची स्थापना ठरावीक घरांतच होत असली तरी शेजारीपाजारी, भाऊबंदकीतले लोक त्या कुटुंबांच्या आनंदात सहभागी होतात. यातून समाजात एकोपा व प्रेम वृद्धिंगत होते व समाज गुण्यागोविंदाने नांदतो.

गाण्यांबरोबर स्त्रिया अहिराणी व मराठी भाषेतील गीत गाऊन रात्रभर जागरण करतात डफ . वाजवून नृत्य करतात, फुगड्या खेळतातप्रसाद म्हणून लाह्या अथवा फुटाणे ., खडीसाखर वाटले जातातघरातली स्त्री अथवा . भक्ती .ठेवली जाते रात्रभर समई तेवत .दाम्पत्य मिळून उपवास करतात, भाव आणि श्रद्धा यांचा अनोखा संगम त्या उत्सवात पाहायला मिळतो

अहिराणी भाषिक कुटुंबीयांचा हा आवडता सण मानला जातो. या सणात रोजचा प्रसाद दिला जातो. हा प्रसाद फक्त कुटुंबातील व्यक्ती खाऊ शकते.

कानुबाईचे विसर्जन दुसऱ्या दिवशी वाजत-गाजत होते. रविवारी सायंकाळी कानुबाईची स्थापना होऊन सोमवारी विसर्जन केले जात असल्याने तिला एका रात्रीची पाहुणी म्हणूनही संबोधले जाते.

**नवसपूर्तीसाठी रोटांचा नैवेद्य –**

कानुबाई नवसाला पावल्यास गव्हाचे ‘रोट’, त्यासोबत तांदळाच्या गोड खिरीचा नैवेद्य दाखवला जातो. अर्थातच देवीच्या नावाने नवस मानलेला असताना रोटांसाठी दळलेले जाडभरडे पीठ संपत नाही तोपर्यंत घरोघरी दोन-तीन दिवस दुसरा स्वयंपाक करत नाहीत. सोबत ‘आलन-कालन’ ही विविध पालेभाज्यांचे मिश्रण केलेली भाजी बनवली जाते.

**टीप:**‘**आलन-कालन**’ **-** श्रावण महिन्यात शेतात सहज उपलब्ध होणाऱ्या हिरव्या पालेभाज्या व इतर भाज्यांचे मिश्रण.

काही ठिकाणी या मिश्रणाला ‘**वाणवान**’ असेही म्हणतात.

संकलन सहाय्यमोरेश्वर सोनार :, प्रारेखा महाजन., प्राप्रतिभा पवार.

खालील संकेतस्थळावरून साभार घेतले-

http://www.thinkmaharashtra.com/theva/%E0%A4%96%E0%A4%BE%E0%A4%A8%E0%A4%A6%E0%A5%87%E0%A4%B6%E0%A4%9A%E0%A5%80-%E0%A4%95%E0%A4%BE%E0%A4%A8%E0%A5%81%E0%A4%AC%E0%A4%BE%E0%A4%88



काहींकडे हातापायाची कानबाई असते तरकाहींकडे कानबाई- रानबाई अशा दोघी बहिणी दोन वेगवेगळ्या

चौरंगावर बसवतात.



